# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, ३०२३३४४७ फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


**अधिसूचना :**

क्रमांक:२अ/एडीएम/२०१०/ २१७९
दिनांक : 15 JUL 2010

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१०-११ मधील प्रथम वर्ष एमबीए/एमएमएस/पीजीडीबीएम/पीजीडीएम,एमसीए पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,वास्तुशास्त्र,हॉटेल मॅनेजमेंट पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत तक्रार निवारण समिती**

शैक्षणिक वर्ष २०१०-११ मधील प्रथम वर्ष एमबीए/ एमएमएस/ पीजीडीबीएम/ पीजीडीएम, एमसीए पदव्युत्तर पदवी ,अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,वास्तुशास्त्र,हॉटेल मॅनेजमेंट पदवी व पदविका अभ्यासक्रम चालविणा-या अल्पसंख्यांक दर्जाच्या संस्थांसह इतर संस्थांमध्ये प्रवेश प्रक्रियेबाबत कोणत्याही तक्रारी असल्यास त्याबाबत शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक एनजीसी-२००७/(१८०/०७)/ मशि-३, दिनांक १४.६.२००७ अन्वये अध्यक्ष म्हणून नियुक्त केलेल्या विभागीय सहसंचालकांशी संपर्क साधावा. सदर तक्रारी केवळ प्रवेश प्रक्रियेसंबंधी असणे आवश्यक आहे. अशा तक्रारी प्राप्त झाल्यानंतर संबंधित संस्था ज्या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीत येते त्या सहसंचालकांच्या कार्यालयाकडून तक्रार निवारणाची कार्यवाही करण्यात येईल.

सर्व विभागीय कार्यालयांचे पत्ते,दूरध्वनी क्रमांक व संबंधित विभागीय कार्यालयांच्या अधिनस्त येणा-या संस्था याची माहिती या संचालनालयाच्या या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(डॉ. सु. श्री. महाजन)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई


# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.**

**/ फॅक्स २५६५६२३४ Email : jdtepu@pn3.vsnl.net.in. Web.repune.org.in**


जा.क्र.विकापु/विवि/तक्रार/२०१०-११/ ७०६६ दिनांक : 3 AUG 2010

प्रति

प्राचार्य, शासकीय, शासकीय अनुदानित, विनाअनुदानित पदवी / पदविका अभियांत्रिकी /वास्तुशास्त्र / औषधनिर्माण शास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी /पदव्यूत्तर पदवी व्यवस्थापन एम.बी.ए आणि एम. सी. ए संस्थाना माहितीसाठी

(डी. एन. शिंगाडे)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : श्री. एस.बी. शिन्दे प्रोग्रॅमर यांना सुचित करण्यात येते की, सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.